वर्ष - ९ वे | फेब्रुवारी - २०१२ | अंक - दुसरा

# साखरसंघ वृत्त

फक्त खाजगी वितरणासाठी

2012 International Year of Cooperatives

**महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि.,** साखर भवन, नरीमन पॉईन्ट, मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २२०४२६७६ / २२०४२९०१ / ४०६८६९०० ● ई-मेल : I) mahasugar@airtelmail.in, II) mahasugarfed@gmail.com

## साखर संघ संचालक मंडळाची - २०१२ मधील पहिली सभा




उपस्थित मान्यवर डावीकडून श्री.अजित चौगुले, व्यवस्थापकीय संचालक(प्र),साखर संघ, मुंबई. मा.श्री.राजगोपाल देवरा, सहकार सचिव, महाराष्ट्र राज्य  मा.श्री.शिवाजीराव नागवडे, उपाध्यक्ष,साखरसंघ. मा.आमदार श्री.जयप्रकाश दांडेगांवकर, उपाध्यक्ष, साखरसंघ. मा.श्री.विजयसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष, साखर संघ, मा.नामदार श्री.जयंतराव पाटील, ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.श्री.अंकुशरावजी टोपे, अध्यक्ष, समर्थ सह.साखर कारखाना लि.,जालना, श्री.प्रमोद कर्नाड, कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.,मुंबई,

## ठळक वैशिष्टये:

- २०११-१२ वर्षासाठी साखर संघाच्या पोटनियमाप्रमाणे माननीय नामदार श्री शरदचंद्रजी पवार व मा.पृथ्वीराजजी चव्हाण मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांची संचालक मंडळावर तज्ञ संचालक म्हणून नियुक्तीस मान्यता देण्यात आली.
- २०११-२०१२ वर्षासाठी संघाचे कार्यकारी मंडळ व अन्य समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. त्या सभासद कारखान्यांना कळविण्यात आलेल्या आहेत तसेच बाह्य संस्थांवरील प्रतिनिधींची निवड करुन पाठविण्यात येणार आहे.
- आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०१२ साजरे करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे ठरले. तसेच, सोबतच महाराष्ट्राचे शिल्पकार कै.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याने दोन-तीन कारखान्यावर त्या संदर्भात कार्यक्रम घेण्याचे ठरले.
- नियंत्रित साखरेची किंमत हंगाम २०१०-११ ते २०१२-१३ साठी निश्चित करण्याबाबत केंद्र शासनाने टॅरीफ कमिशनकडे अहवाल मागितला आहे. त्याप्रमाणे त्यांचे अधिकारी दोन वेळा आले होते. त्यांना साखर संघाने व सभासद कारखान्यांनी सविस्तर माहिती दिली.
- किमान वैधानिक दरापेक्षा जादा दिलेली उस किंमत नामंजूर करुन त्यावर टॅक्स आकारणी होत असून

# उसाच्या भरघोस उत्पादनासाठी वापरा 'महाधन' ची दर्जेदार उत्पादने

## महाधन बेनसल्फ

**भारतातील पहिले दाणेदार (पेस्टाईल) ९०% गंधक खत**

पिकांच्या गरजेनुसार उपलब्ध.

जमिनीतून कमीतकमी निचरा.

इतर खतांबरोबर मिसळून देण्यास उत्तम.

उसामध्ये रसाची प्रत सुधारून साखरेचे प्रमाण व उतारा वाढतो.

उसामधील बुरशीजन्य रोग प्रतिकारशक्ती वाढते.

अल्कधर्मीय, चुनखडीयुक्त व चोपण जमीन सुधारते. परिणामी उसामध्ये लोहाच्या कमतरतेमुळे पडणाऱ्या केवड्याचे नियंत्रण होऊन पीक हिरवेगार होते.

**पिकाचा दर्जा सुधारून उत्पादन वाढविते**

*एकरी प्रमाण : लागवडीच्या वेळी एकरी १५ किलो व मोठ्या बांधणीच्या वेळी एकरी २० किलो इतर खतांसोबत मिसळून द्यावे.*

**५, १० व २५ किलो पॅकिंगमध्ये उपलब्ध**

## महाधन क्रांती

**पिकांच्या संपूर्ण वाढीसाठी सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खत**

नत्र, स्फुरद व पालाश अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढविते.

पानांमधील हरितद्रव्य निर्मितीस सहाय्य.

उसाच्या कांडीची जाडी व लांबी वाढविते.

उसामधील साखरेचे प्रमाण वाढवून कांड्यामधील पोकळपणा दूर करते.

कांडीचा आतील भाग लाल होण्यापासून बचाव करते.

**पीक व मालाचा दर्जा सुधारून उत्पादन वाढविते**

*एकरी प्रमाण : लागवडीच्या वेळी एकरी १० किलो व मोठ्या बांधणीच्या वेळी एकरी १० किलो इतर खतांसोबत मिसळून द्यावे.*

**१० व २५ किलो पॅकिंगमध्ये उपलब्ध**

**दीपक फर्टिलायझर्स अ‍ॅण्ड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड**

गोल्फ कोर्स समोर, शास्त्रीनगर, येरवडा, पुणे - ४११ ००६. फोन : (०२०) ६६४५ ८११२/१३

फॅक्स : (०२०) २६६८ ३७२७ इ-मेल : vbpatil@deepakfertilisers.com वेबसाईट : www.dfpcl.com

**'महाधन' - कृषि समृध्दीचे अभियान**

टॅक्स वसूलीसाठी आयकर खात्याकडून दमनकारी कारवाई होत आहे. यास्तव उच्चतर पातळीवरुन प्रयत्न करण्याचे ठरले.

- भारतीय प्रतिस्पर्धा आयोग नवी दिल्लीच्या केसबाबतचा निकाल आपल्या बाजूने लागला आहे. त्यासाठी आपल्या वकीलांचे अभिनंदन करण्यात आले.
- २०११-१२ वर्षासाठी संघाच्या संचालक मंडळावर तीन महिला संचालिकांना स्वीकृत करण्याबाबत मा.अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना दिलेल्या अधिकारान्वये नियुक्ती करण्यात आली.

१. सौ. विजया उत्तमराव पाटील, यशवंतराव मोहिते, कृष्णा स.सा.का.लि., जिल्हा सातारा.

२. सौ. मिनाक्षी पोपटराव सावंत, शंकर स.सा.का.लि., सदाशिवनगर, जिल्हा सोलापूर.

३. सौ. शवुंतला प्रल्हादराव काळे, पूर्णा स.सा.का.लि., बसमतनगर, जिल्हा हिंगोली.

- रबर टायर गाडीच्या भाड्याबाबत विचार करताना रु.१०/- ऐवजी रु.२०/- आकारण्यास मंजूरी देण्यात आली.

संपादकीय

# आंतरराष्ट्रीय साखर दृष्टीक्षेप :

आशिया खंडामधील विभागामध्ये दीर्घ कालावधीकरिता साखरेची पुरवठयापेक्षा मागणी ही सुमारे ३० लाख टनाने अधिक असल्याचे ग्रीन पुल कमोडिटी स्पेशालिस्टचे संचालक श्री.टॉम मॅक निल यांचे म्हणणे आहे. या विभागातील देशांच्या अर्थव्यवस्था वृध्दींगत होत असतांना मागणी/खपांच्या प्रमाणात पुरवाठयाचा समतोल राखता येत नाही असे त्यांनी म्हटले आहे.

आशिया खंडातील तूट ही जागतिक बाजार पेठेतील अधिक पुरवठा समाविष्ट करु शकेल. कारण २०१२-१३ हे वर्ष सतत दुसऱ्या वर्षी मागणीपेक्षा उत्पादन जास्त असणारे आहे. चालू वर्षी जागतिक उत्पादन हे ७५ लाख टनानी व पुढील वर्षी ४५ लाख टनाने जास्त राहणार असल्याचे भाकीत आहे. आंतरराष्ट्रीय वायदेबाजार (International Commodity Exchange ICE) मध्ये कच्च्या साखरेच्या भविष्यकालीन बाजारामध्ये अमेरीकेचे २०११ मध्ये २७ टक्क्याने नुकसान झाले. जो या दशकातील सर्वात अधिक निच्चांक होता. कारण सतत दोन वर्षामध्ये जागतिक बाजारपेठेमध्ये अतिरिक्त उत्पादन असल्याच्या अनुमानावरुन व्यापाऱ्यांनी ही विक्री केली.

वर्ष २०११-१२ मध्ये साखरेचे अतिरिक्त उत्पादन असल्यामुळे जगातील विविध देशातील स्थानिक बाजारामध्ये २०११ च्या तुलनेत साखरेचे दर कमी राहणार असल्यामुळे, मागणी अधिक प्रमाणावर राहील. या कमी किंमतीमुळे जगातील बाजारपेठेमधील अधिक साठयामुळे दर कमी राहतील व आयात करणाऱ्या देशांना किंमतीवर जादा आयात कर लावावा लागणार नाही. रशिया गेली अनेक वर्षे जगातील कच्च्या साखरेचा मोठा आयातदार होता. परंतु त्यांचे उत्पादन सतत दोन वर्षामध्ये (२०११-१२ मधील) पिकाचे क्षेत्र वाढल्यामुळे त्यांनी आयात कमी केली आहे. तसेच चीनमध्ये यावर्षी ऊसाचे चांगले उत्पादन असल्यामुळे २०११ मध्ये त्यांनी मोठया प्रमाणावर कच्च्या साखरेची आयात केली होती, ती यावर्षी कमी होईल. यामुळे इंडोनेशियाला जागतिक बाजारपेठेतील कमी दराचा फायदा मिळेल. परंतु त्याचवेळेला त्यांच्या देशांतर्गत किंमती होतील.

साखरेची बाजारपेठ ही अल्प मुदतीच्या अनिश्चितेच्या तत्वावर काम करेल तर दीर्घ मुदतीची आयात ही साखरेच्या साठयाच्या पुरवठयावर अवलंबून राहील. या तत्वानुसार २०१२ मधील बाजारपेठ आकार घेईल.

प्रतिवर्षी जागतिक बाजारपेठेमध्ये जी वाढझाली आहे ती बीट साखर निर्मितीपासून झाली आहे ती खालीलप्रमाणे आहे.

१) युरोपियन युनियन (बीटापासून साखर) - ३० लाख टन

२) रशिया (बीटापासून साखर) - २८ लाख टन

३) भारत (ऊसापासून साखर) - १५ लाख टन

४) थायलंड (ऊसापासून साखर) - १० लाख टन

५) युक्रेन (बीटापासून साखर) - ०९ लाख टन
६) ऑस्ट्रेलिया (ऊसापासून साखर) - २.५० लाख टन
७) ब्राझील (ऊसापासून साखर) - २५ लाख टन

सततच्या दोन वर्षाच्या कठिण कालखंडानंतर मध्य व दक्षिण ब्राझीलने उत्पादन वाढीकरिता बराच खर्च केला आहे. त्यामुळे उत्पादनात वाढ दिसून येते. परंतु उत्पादनातील वाढ ऊसाच्या उत्पादनातील वजनातील घट ही सतत तीन वर्षांचा खोडवा घेतल्यामुळे व १ वर्ष लागण एकूण चार वर्षाचे पीक असल्यामुळे घट दिसून येते. तसेच ऊस वाढीकरिता आर्थिक पुरवठा जाहीर केल्यामुळे १० लाख हेक्टरवरील ऊस पिकाचे पुनर्जीवन होईल व काही प्रमाणावर नवीन लागवड होईल.

**इथेनॉल :**

वर्ष २०११ मध्ये शेती मालाच्या किंमती या उच्च स्तरावर असल्यामुळे साखरेचे उत्पादन वाढले व इथेनॉलचे उत्पादन घटले. त्यामुळे स्थानिक बाजारपेठेमध्ये त्या त्या देशांमध्ये पुरवठा होवू शकला नाही. परंतु आता जागतिक बाजारपेठेमधील अन्नधान्यांच्या किंमती कमी होत असल्यामुळे व इंधनांच्या किंमती स्थिर असल्यामुळे यावर्षी २०१२ मध्ये उलटे चित्र दिसेल. तरी २०११-१२ मध्ये ब्राझीलमधील ऊसाचे उत्पादन कमी असले तरी इथेनॉल ऐवजी साखर उत्पादनावर ब्राझीलने भर दिला.

ब्राझीलमधील ऊसाचे उत्पादन वाढण्याचे संकेत आहेत. त्यामुळे ब्राझीलमधील कारखान्यांना पैशांची आवश्यकता असल्याने इथेनॉल व साखरेचा साठा अधिक असल्यामुळे किंमतीवर मर्यादा दिसून येतात. असे आंतरराष्ट्रीय तज्ञांचे म्हणणे आहे. यास्तव भारतास एप्रिल अखेर व मध्य मे २०१२ पर्यंत साखर निर्यातीस वाव आहे.

**नवीन व नवकरणीय उर्जा मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने, कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया, तर्फे साखर कारखान्यावर आधारीत सहविजनिर्मीती प्रकल्प या विषयावर तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबीरे महाराष्ट्र व उत्तर प्रदेश या ठिकाणी आयोजीत करण्यात आली होती.**

## सहवीज अभियंते प्रशिक्षण शिबीर




**नांदेड प्रशिक्षण शिबीर दि.१० ते १२ जानेवारी, २०१२**

*उच्च पदाधिकारी डावीकडून श्री. अंबादासरावजी भोसले, उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, हिंगोली, श्री. जयप्रकाश दांडेगावकर, आमदार, संचालक, पुर्णा सह.साखर कारखाना लि., हिंगोली आणि उपाध्यक्ष, साखरसंघ, मुंबई, श्री. गणपतरावजी तिडके, अध्यक्ष, भाऊराव चव्हाण सह.साखर कारखाना लि., नांदेड*

दिनांक १० ते १२ जानेवारी, २०१२ दरम्यान नांदेड येथे झालेल्या प्रशिक्षण शिबीराचा शुभारंभ मा. आमदार श्री जयप्रकाशजी दांडेगांवकर, उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि. मुंबई यांच्या शुभहस्ते झाला. सन्माननीय अतिथी मा. श्री गणपतरावजी तिडके, अध्यक्ष, भाऊराव चव्हाण सह. साखर कारखाना लि., जि. नांदेड हे होते.

शिबीरा दरम्यान नजिकच्या पुर्णा सहकारी साखर कारखाना लि., जि. हिंगोली व गंगाखेड शुगर ॲण्ड पॉवर प्रा. लि., जि. परभणी यांच्या सहवीजनिर्मिती प्रकल्पांच्या अभ्यास भेटी आयोजित करण्यात आल्या.

## ● दिनांक २ ते ४ फेब्रुवारी २०१२ दरम्यान पांचगणी, जि. सातारा

या निसर्गरम्य ठिकाणी आयोजित केलेल्या प्रशिक्षण शिबीराचा शुभारंभ मा.श्री विजय सिंघल, (भा.प्र.से.) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते झाला. त्यांचे समवेत श्री अशोक गाडे, सहसंचालक (उपपदार्थ), साखर आयुक्तालय, श्री श्रीकांत शिंदे, महाराष्ट्र राज्य उर्जा निर्मिती कंपनी लि. (महानिर्मिती), मुंबई, व कोजन इंडियाचे श्री अजित चौगुले, कार्यकारी संचालक व श्री सुनिल नातू, सदस्य सचिव, हे उपस्थित होते.



*सहवीज प्रशिक्षण शिबीर, पांचगणी, जि. सातारा: उद्घाटक मा. श्री. विजय सिंघल, साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, डावीकडून, मा.श्री.अशोक गाडे, सहसंचालक (उपपदार्थ), साखर आयुक्तालय, श्रीमती अनिता खताळ व श्री. सुनिल नातू, कोजन इंडिया, पुणे.*

## ● दिनांक ९ ते १० फेब्रुवारी २०१२ दरम्यान रूरकी, उत्तर प्रदेश

दिनांक ९ ते १० फेब्रुवारी २०१२ दरम्यान रूरकी, उत्तर प्रदेश येथे यावर्षीचे शेवटचे साखर कारखान्यावर आधारीत सहविजनिर्मीती प्रकल्प या विषयावरील प्रशिक्षण शिबीर पार पडले. शिबीरा दरम्यान नजिकच्या कार्यान्वित असणाऱ्या मेर्सस त्रिवेणी इंजिनिअरींग ॲण्ड इंडस्ट्रियल लि., देवबंद, उत्तर प्रदेश या कोजन प्रकल्पास भेट दिली.

वरील शिबीरांमध्ये विविध विषयांवरील चर्चासत्रे, यावर आधारीत सादरीकरणे व तज्ञांनी मार्गदर्शन केले. शिबीरार्थीना कोजन इंडियातर्फे प्रशस्तीपत्रके दिली गेली. त्यांच्या प्रश्नांची व अडीअडचणींची सांगोपांग चर्चा करुन शंकांचे निरसन करण्यात आले. विविध नवीन तंत्रज्ञाना विषयी माहिती दिली गेली. शिबीरार्थींनी शिबीराबद्धल सार्थकता व समाधान व्यक्त केले.

## सहवीज प्रशिक्षण शिबीर पांचगणी समारोप दि.०४ फेब्रुवारी २०१२



*सहवीज प्रशिक्षण शिबीर पांचगणी समारोप दि.०४ फेब्रुवारी २०१२ उजवीकडून श्री.अजित चौगुले, कार्यकारी संचालक, कोजन इंडिया आणि व्यवस्थापकीय संचालक (प्र) साखर संघ, मुंबई श्री.गिरीष राणे, व्यवस्थापक, इंडियन एनर्जी एक्सचेंज, डॉ.विजयभाई पटेल, मुख्य सल्लागार, (सीडीएम), मिटकॉन, पुणे, श्री.अशोक गाडे, सहससंचालक, साखर आयुक्तालय, पुणे आणि इतर.*

**सुविचार:** सामान्य व्यक्तींमध्येही असामान्य शक्यता असतात, यावर अढळ श्रध्दा म्हणजे लोकशाही.

- हॅरी इमर्सन फॉसडिक

**होळी-धुलिवंदन व गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!**

**"साखर संघ वृत्त"** प्रत्येक महिन्याला www.mahasugarfed.org. या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

संपादक व प्रकाशक :
**श्री. अजित चौगुले**
व्यवस्थापकीय संचालक (प्र.)

: संपादकीय सल्लागार समिती :

**श्री. भीमराव पां. मोरे**
उपसचिव व आर्थिक अधिकारी, मुंबई

**श्री. श्रीकांत एस. सूर्यवंशी**
वाणिज्य अधिकारी

**कु. सुषमा धुळे**
पर्यवेक्षिका

**सौ. सुचिता चाळके**
सहाय्यक

**महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि.,**
**साखर भवन, नरीमन पॉईन्ट, मुंबई - ४०० ०२१.**
दूरध्वनी : 2204 2676 / 2204 2901 / 4068 6900 । तार : "SAKARSANGH" Mumbai
ई - मेल : I) mahasugar@airtelmail.in, II) mahasugarfed@gmail.com
संकेत स्थळ (Website) www.mahasugarfed.org । फॅक्स : 2204 2578 @ 4068 6998

# FOLLOW the LEADER In ALCOHOL Technology

PRAJ




**W**e were the first to tropicalize continuous fermentation technology for alcohol/ ethanol production.

We were the first to introduce column internals to bring down steam consumption in distillation plant.

We were the first to introduce **'multi-feed'** distillery plant.

We were the first to install **'multi-pressure'** distillation system in India.

We were the first to introduce **'secondary cane juice** to ethanol' technology in India.

We were the first and only alcohol technology company to invest in an R&D Center dedicated to the ethanol industry.

We are the first to introduce Molecular Sieve Dehydration plants (vapor phase) in India for producing Fuel Ethanol.

We are also the first to successfully integrate cane streams for ethanol production.

And now, we are the first to demonstrate ***'Sweet Sorghum to Ethanol'*** production process at plant scale.

**PRAJ...Global leadership.. with over 450 references...**

**across 5 continents ...In more than 45 countries.**

HIFERM
FERMENTATION SYSTEMS

ECOFINE
DISTILLATION SYSTEMS

ECOMOL
Fuel Ethanol Plants

ECOVAP-FB
Flubex Evaporation

ECOMET-XT
Biomethanation System

BIOCOMP
Composting System

**PRAJ INDUSTRTIES LIMITED,**
Praj House, Bavdhan,
Pune 411 021. INDIA.
**Tel** : +91 20-22951511/22905000
**Fax**: +91-20-22951718/22951515
**E-mail** : info@praj.net
**URL** : www.praj.net

# TELTECH INSTRUMENTATION PVT LTD

*A Joint Venture with Alma Ingenierie, France*

An ISO 9001-2000 Certified Company

## WORLD CLASS POSITIVE DISPLACEMENT FLOW METERS IN MECHANICAL & DIGITAL READ OUT


- **Weights & Measures Approved**
- **Accuracy ±0.1% (Mech); ±0.05% (Electronic)**
- **Sizes: 1½" to 8" ● Flow: 35 to 5500 LPM**
- **Control Consumption ● Stop Pilferage**

## PRODUCT RANGE

### MECHANICAL CONFIGURATION



C35 Meter with Preset Valve for Batch Operation



Bulk Meter with Preset Valve for Batch Operation



E-type totaliser



Flow Meter Double Case




Strainer cum Air Eliminator C35



Offset Strainer cum Air-eliminator


### ELECTRONIC CONFIGURATION



Flowmeter with Pulse Transmitter



TISI Batch Controller



MICROCOMPT Batch Controller



Digital Control Valve- Diaphragm

### MASTER METERS & PROVING TANKS



Proving Tank Mobile



Master Meter

## OTHER PRODUCTS

**● Flame Arresters ● Pressure Vacuum Breather Valves**
**● Slot Dipping Devices ● Safety Valves ● Grounding Units**

**Contact - Authorised Sales Distributors & Service Franchisee**

# MARS Products & Services

B-Wing, Royal Sands, #301A & 306, Near Royal Classic, New Link Road
Andheri (W), Mumbai 400 053, India
Tel. : +(91) (22) 2632 2102 / 2633 1073 / 2630 1121 ● Fax : + (91) (22) 2630 0225
E-mail : marsmumbai@marsps.com / yesmars@vsnl.com
Warehouse : Navi Mumbai ● Representatives : Gujarat, Karnataka, A.P., M.P.